**अर्जदार तर्फे साक्षीदार क्र. –०२** **एम.जे.सी.क्र.४७/२०१६**

**संघपाल विरुध्द यशवंत**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की** **निशाणी – ३३**

**सरतपासणी शपथेवर सुरु द्वारे वकील श्री.गजवे यांच्या मार्फत**

**०५.** मी सदर प्रकरणात माझे सरतपासाचे लेख दाखल केला असून त्यातील मजकूर अर्जदारच्या वकीलांनी माझे सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे. त्यातील मजकूर माझे माहितीप्रमाणे खरा व बरोबर असून त्यावर मी वाचून समजून सही केली आहे. तो निशाणी ३३ वर आहे.

**०६.** आता मला आर्टिकल अ–१ ते अ–८ वरील फोटो दाखविण्यात आले. सदरचे फोटो मी काढलेले आहेत. त्यांना ओळखीकरीता **निशाणी ३५ ते ४२ अनुक्रमे** देण्यात येते.

**०७.** त्या संदर्भात मी अर्जदारला प्रमाणपत्र लिहून दिले होते. आता मला कागदयादी निशाणी ३२ अनुक्रमांक ०१ कडील प्रमाणपत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला **निशाणी ४३** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास गैरअर्जदार तर्फे वकील श्री ए.डी. भिमटे यांच्यातर्फे**

**०८.** मी एकुण १५ फोटो काढले होते. मी एकावेळेस २ ते ३ यानुसार पंधरा दिवसाच्या अंतराने दोन ते तीन फोटो काढत होतो. मी अर्जदाराला लहानपणा पासून ओळखतो. मी अर्जदाराला ३० ते ३५ वर्षापासून ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की ज्या वस्ती मध्ये अर्जदार राहतो त्याच वस्तीमध्ये मी राहतो.

**०९.** मी फोटोग्राफिचे प्रशिक्षण घेतलेले नाही व त्या संदर्भातील प्रमाणपत्र माझे कडे नाही. माझे दुकान चंद्रमणी नगर, कामठी येथे आहे. त्या दुकानाचा गुमास्ता माझे कडे आहे. हे म्हणणे खरे आहे की निशाणी क्र.३५ ते ४२ कडील फोटो एकाच दिशेने काढलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की मी ज्या कॅमेरा मधून फोटो काढले तो रीलचा कॅमेरा नव्हता. हे म्हणणे खरे आहे की मी डिजिटल कॅमेराने फोटो काढले आहे व त्यामध्ये मेमरी कार्ड असते. हे म्हणणे खरे आहे की त्या मेमरी कार्ड वरुन संगणकाच्या सहायाने मी निशाणी ३५ ते ४२ वरील फोटोची प्रिंट काढली आहे. हे म्हणणे खरे आहे की डिजिटल कॅमेराद्वारे फोटो घेतल्यास त्या फोटो वर वेळ व तारीख दिसून येते. हे म्हणणे खरे आहे की मी ज्यावेळेस फोटो घेतले तेव्हा माझ्या कॅमेरा मध्ये वेळ व तारीख सेट केलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की निशाणी ३५ ते ४२ कडील फोटोवर तारीख व वेळ मी माझ्या हाताने नमूद केली आहे. हे म्हणणे खरे आहे की मी मुळ मेमरी कार्ड याकामी दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की संगणकावर आपल्याला हवे तसे छायाचित्र तयार करता येते. हे म्हणणे खरे नाही की माझे कडे गुमास्ता

नाही. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे मी अर्जदारला फोटोचे बिल दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की निशाणी ४३ कडील प्रमाणपत्रामध्ये गुमास्ता क्रमांक अगर दुकानाचा नोंदणी क्रमांक नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की प्रमाणपत्रामधील तारखेमध्ये खाडाखोड आहे. हे म्हणणे खरे नाही की मी अर्जदारच्या मर्जीनुसार निशाणी ३५ ते ४२ कडील फोटो तयार केले आहे. हे म्हणणे खरे नाही की अर्जदारच्या सांगण्यावरुन मी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला**.

**फेरतपासणी नाही**.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

**स्वाक्षरी/-**
( अमित अ. कुळकर्णी )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कामठी

कामठी
दिनांक ०१/११/२०२३